Since 1935

'SUB' का साथ, आपका विकास!

# सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,सांगली (शेड्युल्ड बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, राम मंदिर रस्ता, सांगली - ४१६ ४१६

फोन : (०२३३) २३७६२३६/३७/३८

ईमेल : subsachiv@gmail.com



## ८७ व्या वर्षाचे प्रतिवृत्त

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या बँकेच्या ८७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मी आपणा सर्वांचे संचालक मंडळाचे वतीने मनःपूर्वक स्वागत करीत आहे.

मे २०२२ मध्ये बँकेची पंचवार्षिक निवडणूक पार पडली. या निवडणुकीत सभासदांनी आमचा पारदर्शक कारभार आणि बँक अधिक प्रगतीशीलपणे चालवण्याच्या आमच्या आश्वासनाला पाठिंबा देऊन आम्हांला पुन्हा निवडून दिले आहे. आपल्या या विश्वासास पात्र राहून, आम्ही सन २०२२ - २३ या आर्थिक वर्षात बँकेचे आर्थिक व्यवस्थापन केले आणि सर्वच क्षेत्रात प्रगती केली. त्यामुळे यावर्षी बँकेला रु. ६२ लाख २४ हजार इतका नफा झाला आहे. बँकेचे नेट एनपीए चे प्रमाण २.९४ % आले आहे. बँकेचा CRAR (कॅपिटल टू रिस्क ॲसेट रेशो) १२.९७ % आहे. रिझर्व्ह बँकेचा निकष कमीत कमी ९ % इतका आहे. यावरून बँकेची प्रगती झाली असल्याचे दिसून येते.

कोरोनाचे संकट संपल्यानंतर सर्व उद्योगधंदे व्यवस्थित सुरु झाले आहेत. त्यामुळे बँकेतील ठेवीत व कर्जात वाढ झाली आहे. मात्र कच्च्या तेलाच्या किमतीतील सतत होणारे चढउतार, रशिया आणि युक्रेनमध्ये सुरु असलेला संघर्ष आणि वाढलेली महागाई ही आव्हाने कायम आहेतच. आंतरराष्ट्रीय व भारतीय बाजारातील घडामोडीमुळे रिझर्व्ह बँकेने व्याजदर वाढवणेचा पवित्रा घेतला आहे. परंतु या वर्षी (२०२३ - २०२४) रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या धोरणात व्याजदरात वाढ केलेली नाही. याचा बाजारावर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. रिझर्व्ह बँकेने जून २०२३ मध्ये जाहीर केलेल्या पत धोरणात व्याजदरामध्ये कोणतेही बदल केलेले नाहीत.

वरील सर्व पार्श्वभूमीवर आपल्या बँकेचे सन २०२२-२०२३ या वर्षीचे प्रतिवृत्त आपणांपुढे मंजूरीसाठी सादर करीत आहे.

**वर्षभरातील बँकेच्या कामकाजाचा आढावा :-**

**सभासद संख्या व भाग भांडवल :-** दिनांक ३१/०३/२०२२ अखेर आपल्या बँकेची सभासद संख्या ६३३३४ इतकी होती. अहवाल सालात यामध्ये २६९२ ने वाढ झाली आणि १५६९ ने घट झाली. यामुळे दिनांक ३१/०३/२०२३ अखेर सभासद संख्या ६४४५७ इतकी झाली.

दिनांक ३१/०३/२०२२ अखेर बँकेचे वसूल भाग भांडवल रु. ३६ कोटी ९७ लाख इतके होते. यामध्ये अहवाल सालात रु. ३ कोटी १९ लाख वाढ झाली व राजीनाम्यामुळे रु. १ कोटी ३६ लाख घट झाली. त्यामुळे दिनांक ३१/०३/२०२३ अखेर बँकेचे वसूल भाग भांडवल रु. ३८ कोटी ८० लाख इतके झाले आहे. यावर्षी डिसेंबर महिन्यात भागभांडवल वाढवण्याची मोहिम सर्व शाखांमध्ये मोठ्या उत्साहात राबविण्यात आली. त्याला सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच या कामासाठी सर्व सेवकांनी चांगले काम करून अवघ्या १५ दिवसात सुमारे १ कोटी १० लाख रुपये भांडवल जमा केले. ही मोहिम दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत चालू होती. त्यामुळे दि. ३१ मार्च २०२३ अखेर भांडवलामध्ये चांगली वाढ झाली.

दिनांक ३१/०३/२०२२ अखेर बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) ११.२१ % इतके होते. ते दिनांक ३१/०३/२०२३ अखेर १२.९७ % इतके झाले. रिझर्व बँकेचा निकष ९ % आहे. ज्या सभासदांनी अद्याप किमान रुपये १५००/- इतके भाग भांडवल घेतलेले नाही त्यांनी ते पूर्ण करावे तसेच त्यांनी रु.५०००/- रकमेचे जादा भाग घ्यावेत ही नम्र विनंती आहे.

**स्वनिधी :-** दिनांक ३१/०३/२०२२ अखेर बँकेचा एकूण स्वनिधी रु. ७४ कोटी ०७ लाख इतका होता. अहवाल सालात यामध्ये रु. ६ कोटी ५४ लाख वाढ झाली. त्यामुळे दिनांक ३१/०३/२०२३ अखेर बँकेचा एकूण स्वनिधी रु. ८० कोटी ६१ लाख इतका झालेला आहे. ही वाढ प्रामुख्याने रिव्हॅल्यूएशन रिझर्व्ह फंडामधील रु. ६ कोटी ४५ लाख वाढीमुळे झालेली आहे. दर ३ वर्षांनी बँक आपल्या स्वमालकीच्या जागा/इमारतीचे पुनर्मूल्यांकन करून घेते. दिनांक ३१/०३/२०२३ अखेरची अशी किंमत रु. ६१ कोटी ४८ लाख इतकी आहे. गुंतवणूकीच्या बाजारमूल्यात घट झाल्यामुळे गुंतवणूक घसारा निधीमध्ये रु. ५३ लाख वाढ झाली आहे. राखीव निधी मध्ये रु. ८ लाख ७४ हजार वाढ झाली आहे.

**ठेवी :-** दिनांक ३१/०३/२०२२ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. १०९९ कोटी ९८ लाख इतक्या होत्या. अहवाल सालात रुपये ५ कोटी ३७ लाखाच्या ठेवी जमा झाल्या. त्यामुळे दिनांक ३१/०३/२०२३ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. ११०५ कोटी ३५ लाख इतक्या झाल्या आहेत. ठेवीवरचा खर्च कमी करण्यासाठी बँकेने व्याजदरात कपात केली होती. परंतु सध्या इतर बँकांचे ठेवींचे व्याजदर वाढत आहेत. त्यामुळे आपल्या बँकेनेही गेल्या सहा महिन्यांपासून ठेवींचे व्याजदरात वाढ करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे चालू अहवाल सालात ठेवींमध्ये वाढ दिसून येते. गेल्या वर्षी ठेवींमध्ये लक्षणीय घट झाली होती.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार, यावर्षीही बँकेने ठेवीदारांच्या ठेवींच्या सुरक्षेसाठी डिपॉझीट इन्शुरन्स कॉर्पोरेशन कडे ठेवींचा विमा उतरवला असून त्याचा आवश्यक विमा हप्ता रुपये १ कोटी ३१ लाख वेळेपूर्वी भरण्यात आला आहे. ही रक्कम अहवालातील नफा तोटा पत्रकातील खर्च बाजूच्या क्रमांक १४ समोर दर्शवलेली आहे.

**बाहेरील कर्जे :-** रिझर्व बँकेच्या मान्यतेने बँकेने सन २०१८ मध्ये ग्राहकांकडून रु. १२ कोटी ६८ लाखाच्या दीर्घ मुदतीच्या ठेवी (LONG TERM DEPOSITS) स्वीकारल्या होत्या. त्याच्या मुदती दिनांक ३१ मार्च २०२३ व ३० एप्रिल २०२३ अखेर संपल्या आहेत. दि.३१ मार्च २०२३ अखेरीस रु. ८ कोटी ७९

**पान २ वर पुढे चालू .....**

## सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली
## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
**( फक्त सभासदांसाठी )**

सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली या बँकेची '**८७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**' मंगळवार, दिनांक २९-०८-२०२३ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता विष्णूदास भावे नाट्यमंदीर, हरभट रोड, सांगली - ४१६ ४१६ या ठिकाणी खालील कामकाजांकरिता होणार आहे. सदर सभेस आपण उपस्थित राहावे, ही विनंती.

### : सभेपुढील विषय :

१) दिनांक २२-०९-२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने तयार केलेला दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व सन २०२२-२०२३ चा संचालक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल स्वीकृत करणे.

३) बँकेच्या सन २०२२-२०२३ या वर्षासाठी मा.वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडून आलेला दिनांक ३१-०३-२०२३ अखेरचा ऑडिट मेमोरेंडम स्वीकृत करणे व सन २०२१-२०२२ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम ४९ अन्वये मा.वैधानिक लेखापरीक्षकांनी बुडीत असल्याबद्दल प्रमाणित केलेली कर्ज खाती वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निर्लेखीत करणे.

५) सन २०२२ - २०२३ मध्ये सूट-सवलत व एकरक्कमी परतफेड योजने अंतर्गत व्याजामध्ये सवलत देऊन कर्ज खाती भागविली, त्याची नोंद घेणे.

६) सन २०२२ - २०२३ या सालात बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांनी घेतलेल्या कर्जाची माहिती घेणे.

७) बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ मधील तरतुदीनुसार रिझर्व्ह बँकेचे परिपत्रकास अनुसरुन आर्थिक वर्ष सन २०२३-२०२४ या वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक यांचे नेमणूकीबाबत केलेली कार्यवाही या संदर्भातील माहितीची नोंद घेणे.

८) सन २०२३-२४ चे अंदाज पत्रकाची नोंद घेणे.

९) बँकेच्या स्टाफींग पॅटर्नला मान्यता देणे.

१०) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.

११) सभासदांना प्रशिक्षण देणेबाबतचा पुढील वर्षीचा आराखडा तयार करणे.

१२) मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांची चर्चा करणे.

**मा. संचालक मंडळाचे आदेशावरून**

**ठिकाण : सांगली**
**दिनांक : १५-०७-२०२३**

**उल्हास विठ्ठल नायक**
मुख्य कार्यकारी अधिकारी

### ❊ सभासदांना सूचना ❊

१) वार्षिक सर्वसाधारण सभेची वेळ जरी दुपारी ३.०० वा. असली तरी सर्व सभासदांनी दुपारी २.३० वाजता उपस्थित रहावे. दुपारी २.३० ते ३.०० या वेळेत सर्व सभासदांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

२) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी दुपारी ३.३० वाजता घेण्यात येईल व त्या सभेला गणसंख्या नसली तरी सभेचे कामकाज चालेल.

३) आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता बँकेच्या प्रधान कार्यालयास त्वरित कळवावा.

४) भागधारक कंपन्या,फर्मस्, सोसायट्या इत्यादी संस्थांनी आपल्या संस्थेतर्फे वार्षिक सर्वसाधारण सभेत भाग घेऊन, प्रसंगी मतदान करण्याचा ठराव वा अधिकारपत्र बँकेकडे दि. १८-०८-२०२३ पूर्वी पाठविल्यास सोयीचे होईल.

५) महाराष्ट्र सहकार कायदा कलम ३२ मधील तरतूदीनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयसूचीवरील विषयासंबंधीची कागदपत्रे बँकेच्या प्रधान कार्यालयात सभासदांना दि. २३-०८-२०२३ ते दि. २५-०८-२०२३ या कालावधीत सुट्टीच्या दिवसाखेरीज, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी अगर त्यांचे जागी कामकाज पाहणारे अधिकारी यांच्याकडे पाहावयास मिळतील.

६) सभासदांच्या भाग वर्गाच्या अर्जाचा विचार दिनांक १४-०८-२०२३ ते दिनांक २९-०८-२०२३ अखेर या मुदतीत तहकूब ठेवण्यात येईल.

७) बँकेची website : www.sangliurbanbank.in वर बँकेचा ८७ वा वार्षिक अहवाल दिनांक २४-०८-२०२३ पासून प्रसिध्द करीत आहोत.

**टीप : सभासदांना वार्षिक अहवालाची प्रत नजीकच्या शाखा कार्यालयात दिनांक २४-०८-२०२३ पासून मिळण्याची व्यवस्था केलेली आहे.**

पान १ वरून .....

## प्रतिवृत्त

लाखाच्या दीर्घ मुदतीच्या ठेवी (LONG TERM DEPOSITS) परत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे दि. ३१ मार्च २०२३ अखेरीस रुपये ३ कोटी ८९ लाखाच्या ठेवी या खाती शिल्लक दिसतात. यावर्षी कर्ज वाढीवर विशेष लक्ष केंद्रित केल्यामुळे आणि खातेदारांकडून मिळालेला चांगला प्रतिसाद यामुळे गेल्या तिमाहीत कर्ज वितरणासाठी बाहेरून कर्ज घेण्यात आले. दि. ३१ मार्च २०२३ अखेर बाहेरील कर्ज रुपये १८ कोटी ७८ लाख दिसत आहेत. सरासरी रु. ३ कोटी ९८ लाख इतके बाहेरील कर्ज उचलणेत आले. यावर रु. २३ लाख ३१ हजार व्याज दिले गेले.

भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) वाढवणेसाठी बँकांना विविध उपाय शोधावे लागतात. रिझर्व बँकेने त्यांचे परिपत्रकानुसार नागरी सहकारी बँकांना त्यांचे Tier-I Capital वाढवणेसाठी Perpetual Debt Instrument (PDI) हे बॉन्डस् किंवा डिबेंचर्स च्या स्वरूपात Issue करणेस परवानगी दिलेली आहे. त्यास अनुसरून आपल्या बँकेने (CRAR) वाढवणेसाठी रुपये १० कोटी ७५ लाख इतक्या रकमेचे १० वर्षे मुदतीचे ९.५० % व्याज दराने Perpetual Debt Instrument (PDI) Issue करणेसाठी रिझर्व बँकेकडे प्रस्ताव पाठवला होता. यास रिझर्व बँकेकडून दि. २ मार्च २०२३ चे पत्रानुसार मान्यता मिळाली. त्यानुसार बँकेने सभासदांना/ग्राहकांना दि. ३१ मे २०२३ पर्यंत यामध्ये गुंतवणूक करणेचे आवाहन केले. यास अतिशय चांगला प्रतिसाद मिळून बँकेने दि. ३१ मे २०२३ अखेरीस बँकेच्या एकूण १९ शाखांमधून रु. १० कोटी ७५ लाख इतक्या रकमेचे Perpetual Debt Instrument (PDI) वितरित केले. यास आपण सर्व सभासदांनी व ठेवीदारांनी भरघोस प्रतिसाद दिला. त्याबद्दल धन्यवाद. यामुळे आपल्या बँकेचा (CRAR) भक्कम झाला आहे.

**गुंतवणूक :-** दिनांक ३१/०३/२०२२ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक (बँकांतील मुदत ठेवी + सरकारी कर्ज रोखे) रु. ५०३ कोटी २६ लाख इतकी होती. यामध्ये रु. १४ कोटी ६६ लाख इतकी वाढ झाली. त्यामुळे दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु. ५१७ कोटी ९२ लाख इतकी झाली. यावर्षी बँकेच्या ठेवीमध्ये वाढ झाली आहे, पर्यायाने गुंतवणुकीतही वाढ झाली. यावर्षी सरकारी कर्ज रोख्यांमध्ये रु. ६४ कोटी २५ लाखांनी घट झाली असून मुदत ठेवी मध्ये रु. ७८ कोटी ९१ लाखांची वाढ झाली आहे. सरासरी गुंतवणूकीत सुमारे रु. ७ कोटी ८९ लाख इतकी वाढ झाली आहे.

वर्षभरात केलेल्या गुंतवणूकीच्या व्यवहाराचे दरमहाचे कंकरंट ऑडीट करण्यात आले आहे.

**कर्ज व्यवहार : -** दिनांक ३१ मार्च २०२२ अखेर बँकेची एकूण कर्ज येणेबाकी रु. ६४२ कोटी ३५ लाख इतकी होती. अहवाल सालात यामध्ये रु. ८ कोटी १२ लाखांची वाढ झाली. त्यामुळे दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर बँकेची एकूण कर्ज येणेबाकी रु. ६५० कोटी ४७ लाख इतकी झाली आहे. यावर्षी दसरा दिवाळीच्या सणासुदीच्या कालावधीमध्ये वाहन खरेदीसाठी विशेष अभियान राबविण्यात आले, त्यासाठी सर्व शाखांना उद्दिष्टे देण्यात आली, जे सर्व शाखांनी पूर्ण केले. मागील वर्षी वाहन कर्ज १६ कोटी रुपये होते, ते या वर्षी सुमारे ३५ कोटी रुपये झाले आहे. तसेच डॉक्टरांसाठी धन्वंतरी कर्ज योजना, शैक्षणिक कर्जासाठी सुधारित कर्ज योजना, सोने तारण कर्जासाठीही विशेष योजना, अशा विविध योजना राबवल्या. घर खरेदीसाठी देखील विविध योजना आणल्या गेल्या. यासही चांगला प्रतिसाद मिळून सुमारे रु. ६ कोटीने कर्जे वाढली. सध्याच्या व्याजदराच्या स्पर्धेमुळे बँकेने कर्जाचे व्याजदरही कमी केले आहेत. बँकेने औद्योगिक व्यवसायासाठी MSME अंतर्गत येणाऱ्या कर्जासाठी व्याजदर ८.७० % पर्यंत कमी केला आहे. यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपली बँक शेड्यूल्ड असलेने प्रधानमंत्री आवास योजना आपल्या बँकेस लागू आहे. त्या अंतर्गत बँकेने चालू वर्षात रु. २ कोटी ७५ लाख रुपयांचे कर्ज दिले आहे. या सर्वांना केंद्र सरकार कडून योग्य ते अनुदान (रु. ५२ लाख ८३ हजार) प्राप्त झाले आहे. सदर योजना दि. ३१ मार्च २०२२ अखेर पर्यंतच चालू होती. ही योजना सुरु झालेपासून दि.३१ मार्च २०२३ अखेर बँकेने एकूण ११३ कर्जदारांना रु.१७ कोटी ८१ लाख रुपये कर्ज दिले आहे आणि त्यांना रु.२ कोटी ८७ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे.

दि. ३१ मार्च २०२२ अखेर C.D. Ratio ५८.४०% इतका होता तो यावर्षी ५८.८५% पर्यंत वाढला आहे. मार्च २०२३ अखेरीस बँकेचे अग्रक्रम क्षेत्र कर्जाचे प्रमाण ६१.७६ % इतके आहे. जे रिझर्व बँकेचा ६०% निकष पूर्ण करते. तसेच Micro Enterprises साठी दिलेल्या कर्जाचे प्रमाण ९.९६ % आहे. रिझर्व बँकेचा निकष ७.५०% देखील पूर्ण झाला आहे.

अग्रक्रम क्षेत्र व दुर्बल घटकासाठीचे आवश्यक असलेले प्रमाण दरवर्षी वाढणार आहे त्यामुळे बँक ही उद्दिष्टे पूर्ण करणेसाठी प्रयत्नशील आहे. बँकेचा एकूण व्यवसाय (ठेवी + कर्जे मिळून) रु. १७५५ कोटी इतका झाला आहे.

**थकबाकी व एनपीए :-**

बँकेचे निव्वळ एनपीए चे प्रमाण ६.९५% वरून ४.०१% ने कमी होऊन २.९४ % झाले आहे. रिझर्व बँकेच्या निकषानुसार यावर्षी नेट एनपीए ३ % चे आत आणला असून ही बँकेच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय बाब आहे. बँकेने पुढील वर्षी शून्य % निव्वळ एनपीए करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

वर्ष अखेरीस ग्रॉस एनपीए चे प्रमाण १६.२५% इतके आहे. जे मागील वर्षी १९.८९ % होते. मागील वर्षीच्या तुलनेत एनपीए च्या रकमेत २२ कोटी रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे एकूण ग्रॉस एनपीए ची टक्केवारी ३.६४% ने कमी झाली. एनपीए वसुलीसाठी सर्वांनी केलेल्या चांगल्या प्रयत्नांमुळे यावर्षी एनपीए मध्ये चांगली घट झाली आहे. यावर्षी कोणतीही नवीन खाती एनपीए मध्ये येणार नाहीत यासाठी संचालक मंडळ कटिबध्द आहे. थकबाकीदारांनी आपापली खाती नियमित/रेग्युलर ठेवलेस बँकेची थकबाकी व एनपीए कमी होण्यास मदत होणार आहे. तरी यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, अशी विनंती, संचालक मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

बँकेने यावर्षीही एकरकमी कर्ज परतफेड योजना (OTS) लागू केलेली नाही. परंतु पूर्वीच्या मंजूर प्रकरणां-मधील, ७ खात्यांमधून रु. ३५ लाख ०२ हजार वसूल करण्यात आले व सूट सवलत अंतर्गत सुमारे ५७ खात्यांमधून रु. ७२ लाख ३० हजार वसूल करण्यात आले. तसेच सिक्युरिटायझेशन कायद्याचाही वापर करून एन.पी.ए. खात्यांतून सुमारे रु. १३ कोटी १३ लाख वसूल करण्यात आले. या अंतर्गत एकूण ५ खाती बंद करण्यात आली असून १६ खात्यांमध्ये अंशतः रक्कम जमा झाली.

**उत्पन्न व खर्च :-** सन २०२२ - २०२३ या वर्षात बँकेला एकूण रु. ९२ कोटी ६२ लाख उत्पन्न मिळाले. हे गतवर्षीच्या उत्पन्नाच्या तुलनेत रु. ४ कोटी ६५ लाखांनी घटले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत एकूण कर्जात ८ कोटी रुपयांची वाढ झाली असली तरी सरासरी कर्जात २८ कोटी रुपयांची घट झाली आहे. कर्जावरील सरासरी व्याज दर गेल्या वर्षीच्या ८.८२ % वरून ८.६८ % आला. त्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत कर्जावरील व्याजात रु. ३ कोटी २९ लाखांची घट झाली आहे.

बँकेच्या गुंतवणूकीत रु. १४ कोटी ६६ लाखांची वाढ झाली असून सरासरी गुंतवणूकीत सुमारे रु. ७ कोटी ८९ लाख इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे त्यावर मिळणाऱ्या व्याजात सुमारे ९३ लाख रुपयांची वाढ झाली आहे. कारण यावर्षी इतर बँकांच्या ठेवींवरील व्याजदरात वाढ झाल्याने त्यातून मिळणाऱ्या व्याजात सुमारे २ कोटी ९३ लाख रुपयांची वाढ झाली आहे आणि सरकारी कर्जरोख्यांची सरासरी कमी झाल्यामुळे त्यावरील मिळालेल्या व्याजात सुमारे रुपये १ कोटी ९८ लाखाची घट झाली आहे. गुंतवणूकीवर मिळणाऱ्या व्याजाचा सरासरी व्याजदर ६.६३ % राहिला. बँकेने आपल्या निधीची योग्य प्रकारे गुंतवणूक केल्यामुळे बँकेचे गुंतवणूकीवरील व्याजाचे उत्पन्न शेकडा ८ पैशांनी वाढले.

गेल्या आर्थिक वर्षात कोरोना मुळे RTGS / NEFT चे व्यवहार कमी होते. ते या वर्षापासून पूर्ववत झाले. त्यामुळे कमिशनमध्ये १६ लाख २५ हजार रुपयांची वाढ झाली आहे. विविध विमा कंपन्यांमुळे सुमारे रु. ३६ लाख ४१ हजार उत्पन्न मिळाले. मागील वर्षी हेच उत्पन्न रु. १९ लाख ६५ हजार मिळाले होते. म्हणजे विमा व्यवसायातील उत्पन्नात जवळपास दुप्पट वाढ झाली आहे.

इतर उत्पन्नांमध्ये रु. २ कोटी ४१ लाख घट झाली आहे. बँकेमार्फत आठ शाखांमध्ये ए.टी.एम. मशीनची सुविधा सुरु आहे. तसेच खातेदारांना मागणीनुसार त्वरीत ए.टी.एम. कार्डे दिली जातात. ATM Transaction charges मध्ये रु. ३ लाख ७७ हजार वाढ झाली, इन्सिडेंटल चार्जेस मध्ये रु. ३१ लाख २३ हजारांची वाढ झाली आहे. यावर्षी बाजारातील अस्थिरतेमुळे सरकारी कर्जरोख्यांची खरेदीविक्री कमी झाली. त्यामुळे या वर्षात सरकारी कर्जरोख्यांची खरेदीविक्री करून बँकेला सुमारे रु. ४५ लाख ८७ हजार उत्पन्न मिळाले. त्यामुळे मागील वर्षाच्या तुलनेत या मिळालेल्या उत्पन्नामध्ये रु. २ कोटी ३८ लाख घट झाली आहे. कर्ज अर्ज छाननी फी मध्ये रु. २५ लाख ८५ हजार व सर्व्हिस चार्जेसमध्ये रुपये ४ लाख इतकी घट झाली आहे.

अहवाल सालात एकूण खर्च रु. ९२ कोटी झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत एकूण खर्चात रु. १४ कोटी ५३ लाखांची घट झाली आहे. सरासरी ठेवी मध्ये घट झालेमुळे ठेवीवरील दिलेल्या व्याजाच्या रकमेत सुमारे रु. ३ कोटी ५८ लाखांची घट झाली आहे व ठेवीवरील सरासरी व्याजदर ५.२०% वर आला आहे. मागील वर्षी तो ५.४१ % होता. मागील वर्षाच्या तुलनेत सेवक खर्चात रु. ७१ लाख ६१ हजारांची घट झाली आहे. घसारा व दुरुस्ती खर्चात रुपये ९ लाख ८१ हजारांची घट झाली आहे. गुंतवणूकीच्या घसारा तरतूदीत रु. १ कोटी ७० लाखांनी घट झाली आहे.

गेल्यावर्षी कोरोनामुळे संचालक मंडळाच्या सभा कमी झाल्या होत्या. यंदा नियमित सभांमुळे संचालक फी व भत्यांमध्ये रु. १ लाख ३९ हजारांची वाढ झाली आहे. लिगल चार्जेस मध्ये रु. १ लाख ६४ हजार, जाहिरात खर्चात रु. १५ लाख ७९ हजार आणि वाहन खर्चात रु. ३ लाखांची वाढ झाली आहे. सामान्य खर्चामध्ये रु. १७ लाख ५२ हजारांची वाढ झाली आहे. इतर खर्चामध्ये रु. ४१ लाख १३ हजार वाढ झाली आहे. ही वाढ प्रामुख्याने सरकारी कर्ज रोख्यांच्या विक्रीतून झालेला तोटा रु. १ कोटी ५२ लाख आणि गुंतवणूकीचे पुनर्वर्गीकरण करताना झालेल्या रु. २ कोटी ७० लाखांच्या तोट्यामुळे झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी एनपीए खात्यांमधील झालेल्या चांगल्या वसुलीमुळे, एनपीए ची तरतूद रु. १३ कोटी ७७ लाखांनी कमी झाली आहे.

**तरतूदी व ढोबळ नफा :-**

वरीलप्रमाणे उत्पन्न-खर्चाचा विचार करता यावर्षी बँकेस तरतूदपूर्व व करपूर्व ढोबळ नफा रु. १ कोटी १५ लाख इतका झाला आहे. यातून गुंतवणूक घसारा तरतूद रु. ५३ लाख केल्यानंतर बँकेस यावर्षी रु. ६२ लाख २४ हजार इतका नफा झाला आहे. त्यामुळे मागील संचित तोटा रु. १८ कोटी ०४ लाख मधून चालू वर्षीचा नफा वजा जाता बँकेस दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर संचित तोटा रु. १७ कोटी ४२ लाख राहिला आहे.

संचालक मंडळाने सन २०२३ - २०२४ या आर्थिक वर्षात संचित तोटा पूर्णपणे भरून काढणेचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार योग्य धोरणे ठरविण्यात आली असून त्याप्रमाणे सर्व शाखांना उद्दिष्टे देण्यात आली आहेत.

पान ८ वर पुढे चालू .....

## सभासदांना जाहीर आवाहन

### के.वाय.सी. / रि- के.वाय.सी. पूर्तता करणेबाबत

रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार खात्यावरील व्यवहारानुसार खात्याचे उच्च, मध्यम व अल्प असे जोखीम वर्गीकरण केले जाते व त्यानुसार खातेदारांनी दर २ वर्षे, ८ वर्षे व १० वर्षांनी के.वाय.सी. ची पूर्तता करून द्यावी लागते. बँकेच्या शाखांमार्फत खातेदारांकडे के.वाय.सी./रि-के.वाय.सी. ची पूर्तता करणेबाबत वारंवार पाठपुरावा केला जात आहे. जे खातेदार के.वाय.सी./रि-के.वाय.सी. पूर्तता करून देत नाहीत, अशा खात्यांचे व्यवहार प्रतिबंधित केले जातात. तसेच बँकेकडून दरवर्षी वर्षअखेरीस रु. २५०/- + जीएसटी चार्जेस आकारले जातात. तरी खातेदारांनी आपल्या के.वाय.सी./रि-के.वाय.सी. ची पूर्तता करून द्यावी. तसेच ओळख व पत्याच्या पुराव्यामध्ये बदल नसलेस तसे डिक्लेरेशन शाखेस द्यावे ही विनंती.

## जाहीर निवेदन

सहकार कायद्यातील तरतूदीप्रमाणे व बँकेच्या पोटनियम क्र. १२ प्रमाणे सभासदांचे क्रियाशील व अक्रियाशील सभासद असे वर्गीकरण केलेले आहे. क्रियाशील सभासदांसाठी खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१) सभासदाने रु. १०/- चा एक याप्रमाणे किमान १५० भाग (रु. १,५०० /-) धारण करणे आवश्यक आहे.

२) सभासदाची किमान रु. ७,००० /- ची ठेव बँकेकडे असली पाहिजे अथवा मागील सलग ५ वर्षांमध्ये किमान एकदा रु. १ लाख इतके कर्ज घेतले असले पाहिजे.

३) सभासद मागील सलग ५ वर्षात किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असला पाहिजे.

वरील पैकी क्रमांक १ ची म्हणजे किमान भाग धारण करणेची पूर्तता आपण केलेली आहे. मात्र क्रमांक २ व क्रमांक ३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे. सहकारी कायदा व पोटनियमातील तरतूदी लक्षात घेता सभासदांनी क्रियाशील सभासदांसाठी आवश्यक अटींची पूर्तता लवकरात लवकर करून सहकार्य करावे, ही विनंती.

Since 1935

SUB

'SUB' का साथ, आपका विकास!

# सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली.

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली - ४१६ ४१६.

## दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ अखेरचे

## नफा-तोटा पत्रक

| दि.३१/०३/२०२२ | खर्च | दि.३१/०३/२०२३ | दि.३१/०३/२०२२ | उत्पन्न | दि.३१/०३/२०२३ |
|---|---|---|---|---|---|
| रुपये पैसे | खात्याचे नांव | रुपये पैसे | रुपये पैसे | खात्याचे नांव | रुपये पैसे |
| ६०,२१,९२,८५५.२४ | १) व्याज दिलेले (ठेवीवरील व कर्जावरील) | ५६,८७,५१,१२९.३९ | ९०,६१,९३,७३०.५९ | १) व्याज मिळालेले | ८८,२५,४२,८०१.७५ |
| २१,७४,४०,९२६.१० | २) पगार, भत्ते, प्रॉव्हीडंट फंड कॉन्ट्रीब्युशन, | २१,०२,७९,९५०.०५ | | (कर्जावरील व गुंतवणूकीवरील) | |
| | एम्प्लॉईज पेन्शन फंड कॉन्ट्रीब्युशन, लेबर | | | | |
| | वेलफेअर फंड कॉन्ट्रीब्युशन, जादा काम भत्ता इ. | | २६,१५,८६४.२३ | २) कमिशन व वटाव | ४२,४१,०४६.८१ |
| ६,०३,५११.२६ | ३) संचालक फी व भत्ते | ७,४३,०८५.०० | | | |
| | अ) संचालक फी व भत्ते - रु. ३,६०,२४०.०० | | ---- | ३) सबसिडी व देणगी | - - - - |
| | ब) संचालक मंडळ प्रवास खर्च | | | | |
| | व दैनिक भत्ता रु. ३,८२,८४५.०० | | २,८४,०२०.०० | ४) नॉन बँकिंग मिळकतीच्या | - - - - |
| १,९३,५२,३०५.६९ | ४) भाडे, दिवाबत्ती, विमा, टॅक्सेस इ. | १,९४,९३,५५६.६७ | | विक्री व्यवहारातील नफा | |
| ७,४०,३८०.०० | ५) कायद्याबाबतचा खर्च | ९,०३,५६४.०० | | | |
| २२,४४,२९१.९० | ६) टपाल व दूरध्वनी | २७,७९,५०६.५५ | ६,३६,०७,३८४.०५ | ५) इतर जमा | ३,९४,५९,२७५.४७ |
| ५०,०९,१२७.३७ | ७) सी.बी.एस.लिज लाईन चार्जेस | ५५,३०,९४८.७४ | | | |
| २९,५०,९०२.०० | ८) हिशोब तपासनीसाचा मुशाहिरा | २७,६१,२६१.८८ | ९,२५,९१,३७७.३० | ६) तोटा असल्यास | - - - - |
| ९४,८०,३६३.०९ | ९) मिळकतीवरील घसारा व दुरुस्ती खर्च | ८४,९९,२१८.४३ | | | |
| ३२,६४,५०२.५० | १०) छपाई, सादिलवार व जाहिरात | ४९,८२,२८९.६२ | | | |
| २४,७२,४६४.०० | ११) बचतनिधी कमिशन | २६,८५,९४४.०० | | | |
| ५८,०९,२७४.७१ | १२) सामान्य खर्च | ७५,६१,१६८.२६ | | | |
| १५,३५,७२८.३७ | १३) वाहन खर्च | १८,४०,७९२.१५ | | | |
| १,३६,७६,४२५.०० | १४) डिपॉझिट इन्शु. प्रिमियम | १,३१,३४,९६६.०० | | | |
| ---- | १५) सरकारी कर्जरोखे विक्रीतील तोटा | १,५१,९५,३५०.०० | | | |
| ---- | १६) गुंतवणूक पुनर्वर्गीकरणातील तोटा | २,६९,९७,४१०.०० | | | |
| १७,८५,१९,३१८.९४ | १७) इतर खर्च व तरतूदी | २,७८,७८,८६९.९४ | | | |
| १,८४,६६,४८५.४४ | अ) इतर खर्च - रु. २,२५,७८,८६९.९४ | | | | |
| १३,७७,५२,८३३.५० | ब) एन.पी.ए. तरतूद - रु. -- | | | | |
| ---- | क) इन्कमटॅक्स तरतूद- रु. -- | | | | |
| | ड) गुंतवणूक घसारा - | | | | |
| २,२३,००,०००.०० | निधी तरतूद रु. ५३,००,०००.०० | | | | |
| --- | १८) नफा | ६२,२४,११३.३५ | | | |
| १,०६,५२,९२,३७६.१७ | एकूण | ९२,६२,४३,१२४.०३ | १,०६,५२,९२,३७६.१७ | एकूण | ९२,६२,४३,१२४.०३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उ. वि. नायक<br>मुख्य कार्यकारी अधिकारी | ग. ह. गाडगीळ<br>अध्यक्ष | CA. श्री. द. खिरे<br>उपाध्यक्ष | CA .अ. वा. मानवी<br>संचालक | डॉ. र. शि. आरळी<br>संचालक |
| ह. य. पाटील<br>संचालक | श्री. क. देशपांडे<br>संचालक | सं. जो. पाटील<br>संचालक | सं. पां. धामणगांवकर<br>संचालक | शै. अ. तेलंग<br>संचालक |
| ॲड. र. र. चव्हाण<br>संचालक | का. र. हरिदास<br>संचालक | सा. सु. घोंगडे<br>संचालक | स. ने. मालू<br>संचालक | सौ. स्वा. मु. करंदीकर<br>संचालिका |
| सौ. अ. ज. आठवले<br>संचालिका | र. वि. भाकरे<br>संचालक | म. बा. कोरडे<br>संचालक | CA सा. श्री. फडके<br>संचालक (स्वीकृत) | वि. प. चितळे<br>संचालक (स्वीकृत) |

**M/s K G B & J ASSOCIATES**
Chartered Accountants
Firm Reg. No. 114849 W
**वैधानिक लेखापरीक्षक, कोल्हापूर.**

**CA Mukund Bhave** PARTNER
Member No. 049124 Co-op. Panel No. 1005
UDIN - 22049124AMIUVM6404 Kolhapur

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : २७/०६/२०२३

# INDEPENDENT AUDITOR'S REPORT

(In compliance with Sec 81of MCS Act,1960 ,Rule 69(3) of MCS Rules and prescribed form N-1)

**To,**

The Members, Sangli Urban Co.Op Bank ltd. 404, Khanbhag, Sangli, 416 416.

Ref: Appointment Letter Reference No HO/INSPECTION & VIGILANCE/CEO/304/2022-23 Dated 13.09.2022

## Report on the Consolidated Financial Statements as a Statutory Auditor

**Opinion**

1. We have audited the accompanying financial statements of the SANGLI URBAN CO - OPERATIVE BANK LIMITED, SANGLI ("the Bank") as at 31st March 2023 which comprise the Balance Sheet as at 31st March 2023 and the Profit & Loss account and Cash Flow Statement for the year then ended, and a summary of significant accounting policies and other explanatory information. The returns of 35 branches audited by us are incorporated in these financial statements.
2. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, except for the effects of matter described in the Basis for Opinion section & further elaborated in comments incorporated in LFAR, Part A, B & C of Statutory Audit, the aforesaid financial statements together with the notes thereon give the information required by the Banking Regulation Act, 1949 (A.A.C.S), the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, the Maharashtra Co-operative Societies Rules 1961 and the guidelines issued by National Bank for Agricultural and Rural Development (as applicable) and guidelines issued by Reserve Bank of India and Registrar of Co operative Societies, Maharashtra in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:
   i) In case of Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at 31st March, 2023.
   ii) In the case of Statement of Profit and Loss Account of the Profit for the year ended on that date and
   iii) In case of the cash flow statement, of the cash flows for year ended on that date.

## Basis for Opinion

3. We conducted our audit in accordance with the Standards on Auditing (SAs) issued by Auditing and Assurance Standard Board (AASB) under the council of ICAI and to the extent applicable. Our responsibilities under those Standards are further described in the Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements section of our report. We are independent of the Bank in accordance with the Code of Ethics issued by the Institute of Chartered Accountants of India together with the ethical requirements that are relevant to our audit of the financial statements under the provisions of the relevant Acts and we have fulfilled our other ethical responsibilities in accordance with these requirements and the ICAI's Code of Ethics.
4. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

## Responsibilities of management and those charged with governance for the consolidated financial statements

5. The Bank's Board of Directors is responsible with respect to the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flows of the bank prepared in accordance with the Banking Regulation Act, 1949 (as applicable to Co-operative Societies), the guidelines issued by Reserve Bank of India and the Registrar of Co-operative Societies, Maharashtra, the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (as applicable) and generally accepted accounting principles in India so far as applicable to Bank including the accounting standards specified by ICAI. This responsibility also includes maintenance of adequate accounting records in accordance with the provisions of the Act for safeguarding of the assets of the Bank and for preventing and detecting frauds and other irregularities, selection and application of appropriate accounting policies, making judgements and estimates that are reasonable and prudent ; and design, implementation and maintenance of adequate internal financial controls, that were operating effectively for ensuring the accuracy and completeness of the accounting records, relevant to the preparation and presentation of the financial statements that give a true and fair view and are free from material misstatement, whether due to fraud or error.

   In preparing the financial statements, the Management is responsible for assessing the Bank's ability to continue as a going concern, disclosing, as applicable, matters related to going concern and using the going concern basis of accounting unless the Management either intends to liquidate the bank or to cease operations, or has no realistic alternative but to do so.

   The Management is also responsible for overseeing the bank's financial reporting process.

## Auditor's Responsibility for the Audit of the Financial Statements :

6. Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statements as a whole are free from material misstatement, whether due to fraud or error, and to issue an Auditor's Report that includes our opinion. Reasonable assurance is a high level of assurance, but is not a guarantee that an audit conducted in accordance with SA's will always detect a material misstatement when it exists. Misstatements can arise from fraud or error and are considered material if, individually or in the aggregate, they could reasonably be expected to influence the economic decisions of users taken on the basis ot these financial statements.

   As part of an audit in accordance with SAs, we exercise professional judgment and maintain professional skepticism throughout the audit. We also:

   ❖ Identify and assess the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error, design and perform audit procedures responsive to those risks, and obtain audit evidence that is sufficient and appropriate to provide a basis for our opinion. The risk of not detecting a material misstatement resulting from fraud is higher than for one resulting from error, as fraud may involve collusion, forgery, intentional omissions, misrepresentations, or the override of internal control.

   ❖ Obtain an understanding of internal control relevant to the audit in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on the effectiveness of the entity's internal control.

   ❖ Evaluate the appropriateness of accounting policies used and the reasonableness of accounting estimates and related disclosures made by management.

   ❖ Conclude on the appropriateness of management's use of the going concern basis of accounting and, based on the audit evidence obtained, whether a material uncertainty exists related to events or conditions that may cast significant doubt on the Bank's ability to continue as a going concern. If we conclude that a material uncertainty exists, we are required to draw attention in our auditor's report to the related disclosures in the financial statements or, if such disclosures are inadequate, to modify our opinion. Our conclusions are based on the audit evidence obtained up to the date of our auditor's report. However, future events or conditions may cause the bank to cease to continue as a going concern.

   ❖ Evaluate the overall presentation, structure and content of the financial statements, including the disclosures, and whether the financial statements represent the underlying transactions and events in a manner that achieves fair presentation. We communicate with those charged with governance regarding, among other matters, the planned scope and timing of the audit and significant audit findings, including any significant deficiencies in internal control that we identify during our audit. We also provide those charged with governance with a statement that we have complied with relevant ethical requirements regarding independence, and to communicate with them all relationships and other matters that may reasonably be thought to bear on our independence, and where applicable, related safeguards.

## Report on other legal and Regulatory Matters

7. The Balance Sheet and Profit and Loss Account have been drawn up in Forms "A" and "B" respectively of the Third schedule to the Banking Regulation Act, 1949 and provisions of Maharashtra Co operative Societies Act, 1960 and the Maharashtra Societies rules, 1961.
8. Subject to the limitations of the Audit indicated in Paragraphs 1 to 6 above, and subject to our observations in Section A, B and C of the Main Audit Report and to the best of our knowledge and according to the information and explanation given to us and as shown by the books of the Bank and read together with the Notes to the accounts we report that:
   a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.
   b) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit received from the branches.
   c) The transactions of the Bank, which have come to our notice, are within the powers of the Bank.
   d) The Balance Sheet and Profit & Loss account dealt with by this report, are in agreement with the books of accounts and returns,
   e) The Accounting standards adopted by the bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable to bank, except for the accounting and disclosure of AS 10 & AS 26.
9. As per the information and explanations given to us and based on our examination of the books of account and other records, we have not come across material instances in respect of the details mentioned in the Rule 69(6) of The Maharashtra co –operative Societies Rules 1961
10. We further report that for the year under audit, the bank has been awarded "B" classification.

Place : Kolhapur
Date : 27.06.2023

**M/s K G B & J ASSOCIATES**
Chartered Accountants
Partner - **CA Mukund K. Bhave**
Mem. No. 049124 FRN – 114849W
UDIN : 23049124 BGUFGM9178

पान २ वरून .....

## प्रतिवृत्त

आपल्या दोन ते तीन शाखा या ग्रामीण भागात काम करीत आहेत. त्या गावात फारसा विकास न झालेने व अन्य बँकांच्या शाखा तेथे आल्याने त्याठिकाणी अपेक्षित व्यवहार वाढू शकत नाही, रिझर्व्ह बँकेने अशा शाखांचे नजीकच्या शाखेत विलीनीकरण करून अथवा या शाखा अन्य ठिकाणी (ज्या ठिकाणी व्यवहार वाढणेस वाव आहे) स्थलांतरित कराव्यात अशी सूचना केली आहे. बँकेने याचा अभ्यास करून तसे प्रस्ताव रिझर्व्ह बँकेस मंजुरीसाठी पाठविणेचे विचाराधीन आहे.

**रिझर्व्ह बँक तपासणी व ऑडीट :–**

दिनांक २२–०९–२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मे. के जी बी ॲण्ड जे असोसिएटस्, कोल्हापूर यांची सन २०२२ – २०२३ या वर्षासाठीचा वैधानिक लेखापरीक्षक नेमणूकीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे पाठविला होता. त्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी बँकेचे लेखापरीक्षण पूर्ण करून अहवाल सादर केला आहे. तो सभेसमोर सादर करण्यात येत आहे. बँकेस या वर्षी 'ब' वर्ग मिळाला आहे. सन २०२३ – २०२४ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांच्या नियुक्तीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे वेळेवर सादर करण्यात आला आहे.

मा. वैधानिक लेखापरीक्षकांनी केलेल्या सूचनांचा विचार करून त्याप्रमाणे कार्यवाही करणेचा प्रयत्न संचालक मंडळ करीत आहे. त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संचालक मंडळाच्या वतीने मी त्यांचे आभार मानतो. सन २०२२ – २३ या आर्थिक वर्षासाठीची रिझर्व्ह बँक तपासणी जुलै–ऑगस्ट २०२३ मध्ये झाली. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनांचा अभ्यास करून त्यानुसार बँकेच्या व्यवहारात सुधारणा करण्याचा बँक प्रयत्न करीत आहे.

**संचालक मंडळ :–**

या आर्थिक वर्षात अध्यक्षपदी माझी, व उपाध्यक्षपदी सीए श्री.श्रीपाद दतात्रय खिरे यांची निवड झाली. तसेच सीए श्री.सागर श्रीपाद फडके व श्री.विश्वास परशुराम चितळे यांची तज्ञ संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच बँकेच्या व्यवस्थापन मंडळ सदस्यपदी बँकिंग विषयातील तज्ञ मा.श्री. जयंत काशिनाथ काकतकर यांची नियुक्ती करणेत आली. त्यांना बँकिंग क्षेत्रातील ३७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी पुणे जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केलेले आहे.

बँकेच्या पोटनियमास अनुसरून तसेच रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. सर्व समित्या व संचालक मंडळाच्या सभेतून बँकेच्या कामकाजाच्या व विकासाच्या दृष्टीने उपयुक्त चर्चेनंतर सर्वानुमते निर्णय घेतले जातात. अहवाल सालात संचालक मंडळाच्या २६ सभा झाल्या व उपसमित्यांच्या ६६ सभा झाल्या. सन २०२२–२०२३ या कालावधीत व्यवस्थापन मंडळाच्या १६ सभा झाल्या. संचालकांनाही विविध संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले.

दिनांक ३१–०३–२०२३ अखेरची संचालक सदस्य व त्यांचे कुटुंबीय यांचे कर्जाची माहिती अहवालात दिलेली आहे.

**सेवक वर्ग :–**

दि. ३१–०३–२०२३ अखेर एकूण सेवक संख्या २६१ इतकी आहे. बँकेच्या १८० सेवकांना वेगवेगळ्या विषयांवर बँकेच्या स्वतःच्या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण देण्यात आले. याच बरोबर गुलाबराव पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र, सांगली, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रशिक्षण केंद्र, सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, सोलापूर, सांगली जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, सांगली. डॉ.व्ही.व्ही. पाटील सहकारी प्रशिक्षण संस्था, पुणे, कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल बँकिंग, पुणे व इतर अशा नामांकित संस्थांमध्ये बँकेने २७४ सेवकांना प्रशिक्षणासाठी पाठवले.

**सेवक प्रशिक्षण कार्यशाळा :–**

बँकिंगमधील सर्व क्षेत्रात असणारी स्पर्धा लक्षात घेता तसेच बँकेची सध्याची गरज लक्षात घेऊन बँकेतील सर्व सेवकांसाठी दि. १८.०२.२०२३ रोजी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये प्रथम सांगलीमधील प्रख्यात नेत्रतज्ञ डॉ. दिलीप पटवर्धन यांचे 'ताण–तणाव व्यवस्थापन' (स्ट्रेस मॅनेजमेंट) या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते, सहकार क्षेत्रातील अनुभवी व्यक्तीमत्व, अप्पर निबंधक (प्रशासन) मा.श्री. शैलेश कोतमिरे यांचे 'व्यवसाय वृध्दी' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

**संगणकीकरण :–** बँकेने यावर्षी लहान व्यावसायिकांसाठी त्यांच्या ग्राहकांकडून UPI द्वारे पेमेंट स्विकारणेसाठी व QR कोडची सुविधा करून दिली आहे. याचा फायदा बँकेस करंट व सेव्हींग (CASA) मध्ये वाढ होणेसाठी होईल. आज अखेर ६२५० इतके QR कोड खातेदारांना दिले आहेत. आजमितीस, बँकेची एकूण ८ On-Site ATM कार्यरत आहेत. तसेच RUPAY DEBIT CARD द्वारे POS व E-Commerce या सुविधाही सुरु आहेत. ग्राहकांसाठी Whatsapp Chat बँकिंग सेवा सुरु केली. या सर्व सुविधांचा ग्राहकांनी लाभ घ्यावा.

**बँक वर्धापनदिन :–** बँकेच्या ८८ व्या वर्धापन दिनानिमित्त बँकेचे ग्राहकांसाठी Whatsapp Chat बँकिंग सेवेचा प्रारंभ मा.आमदार श्री.सुधीरदादा गाडगीळ यांचे हस्ते झाला. तसेच प्रधान कार्यालयामध्ये पानसुपारी, हळदी–कुंकू हा कार्यक्रम आयोजित करणेत आला होता.

**शाखा वर्धापनदिन :–** शाखा वर्धापनदिनाच्या निमित्ताने संचालकांनी जवळपास सर्व शाखांना भेटी देऊन खातेदारांच्या अडचणी लक्षात घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न केला. यावर्षी विविध कर्ज योजना राबवण्यात आल्या, याबाबत संचालकांनी खातेदारांबरोबर संवाद साधून कर्ज वाढीसाठी व NPA वसुलीसाठी प्रयत्न केले. तसेच शाखेतील कर्मचाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांना याचे महत्व समजावून सांगितले.

**सामाजिक बांधिलकी :–**

१) बँकेचे संस्थापक मा. कै. म. ह. तथा आण्णा गोडबोले यांचे स्मृती दिनानिमित्त जळगाव येथील मा.श्री. प्रकाश पाठक यांचे 'समरस राष्ट्र व समृध्द राष्ट्र' या विषयावर व्याख्यान झाले.

२) बँकेच्या ८८ व्या वर्धापन दिनानिमित्त मा.श्री. संजय उपाध्ये यांचा 'मन करा रे प्रसन्न' हा सांस्कृतिक कार्यक्रम मालू हायस्कूल, सांगली येथील प्रांगणात संपन्न झाला.

३) ग्रामपंचायत बुधगांव आणि शाखा बुधगांव यांचे संयुक्त विद्यमाने बुधगांव ग्रामपंचायत हद्दीतील घरपट्टी व पाणीपट्टी भरणा करणेसाठी आपल्या बँकेतर्फे QR CODE सुविधेचा प्रारंभ बँकेचे अध्यक्ष मा. श्री. गणेश गाडगीळ, बुधगांवचे मा.सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत झाला.

**सन्माननीय व्यक्तींच्या भेटी :–**

अहवाल सालात खालील सन्माननीय व प्रतिष्ठित व्यक्तींनी बँकेस भेट देऊन बँकेच्या प्रगती बाबत समाधान व्यक्त केले.

१. **मा.श्री. सतीशजी मराठे** संचालक – भारतीय रिझर्व बँक
२. **मा.श्री. अनिल कवडे** सहकार आयुक्त – महाराष्ट्र राज्य
३. **मा.श्री. शैलेश कोतमिरे** अप्पर निबंधक (प्रशासन) – सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य
४. **मा.श्री. उदयजी जोशी** राष्ट्रीय महामंत्री – सहकार भारती
५. **मा.श्री. संजय पाचपोर** राष्ट्रीय संघटन मंत्री, सहकार भारती
६. **मा.श्री. विवेकजी जुगादे** प्रदेश महामंत्री – सहकार भारती
७. **मा.सौ. वैशाली आवाडे** उपाध्यक्षा– महाराष्ट्र नागरी सह. बँक्स फेडरेशन
८. **मा.श्री. गिरीशजी प्रभुणे** पद्मश्री पुरस्काराने सन्मानित, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते
९. **मा.डॉ.श्री. दिलीप पटवर्धन** नामांकित नेत्ररोग तज्ञ, मोटीव्हेशनल स्पीकर, जीवन विद्या मिशन
१०. **मा.श्री. स्वप्नील आवाडे** अध्यक्ष, कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सह.बँक
११. **मा.श्री. प्रकाश पाठक** ज्येष्ठ व्याखाते
१२. **मा.श्री. संजय उपाध्ये** ज्येष्ठ व्याख्याते
१३. **मा.श्री. निपुण कोरे** अध्यक्ष – श्री वारणा सहकारी बँक अध्यक्ष – कोल्हापूर जिल्हा नागरी सह. बँक्स असो.
१४. **मा.श्री. अरुण काकडे** विभागीय आयुक्त, सहकारी संस्था, कोल्हापूर
१५. **मा.श्री. मंगेश सुरवसे** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली
१६. **मा.श्री. संजय पाटील** विशेष लेखापरीक्षक, सांगली
१७. **मा.श्री. सुनिल चव्हाण** उपनिबंधक, सहकारी संस्था,मिरज
१८. **मा.श्रीमती शशीताई अहिरे** प्रदेशाध्यक्ष – सहकार भारती आणि अध्यक्षा – नाशिक महिला सहकारी बँक
१९. **मा.डॉ. श्री. सुभाष जोशी** कुटुंब प्रमुख, दि कराड अर्बन को.ऑप. बँक

सर्व भागधारक, खातेदार, ग्राहक, हितचिंतक आणि सर्व कर्मचारी बंधू–भगिनी या सर्वांनी बँकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी संचालक मंडळाचे वतीने आभार मानतो.

या अहवालासोबत आपणापुढे सन्माननीय वैधानिक लेखा परीक्षक यांनी प्रमाणित केलेला दि. ३१ मार्च २०२३ अखेरचा ताळेबंद व दि. ०१–०४–२०२२ ते दि. ३१–०३–२०२३ या कालावधीचे नफा–तोटा पत्रक तसेच सन २०२२–२०२३ चा लेखापरीक्षण अहवाल मंजुरीसाठी सादर करीत आहे. त्यास आपण स्वीकृती द्यावी, अशी संचालक मंडळाच्या वतीने मी आपणा सर्वाना विनंती करीत आहे.

धन्यवाद !

जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

**सांगली अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लि, सांगली**
**संचालक मंडळाकरिता,**

**गणेश हरि गाडगीळ**
अध्यक्ष

---

**BOOK - POST** (Annual Report & A/c Statements)

वितरण न झाल्यास या पत्त्यावर पाठवावे. If Undelivered Return To-

**सांगली अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक लि.,सांगली**
प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, राम मंदिर रस्ता,
सांगली – ४१६ ४१६

Licensed to post under pre-payment of postage in cash system under license No : **GR/MAILS/AR/14/SUCBL/PREPAID/BM/14-08-2023**

पत्ता